


26 जनवरी 1950

1950-2025

भारतीय गणतंत्र

अमृतमहोत्सवी वर्ष



# महात्मा गांधी सर्वोदय भवन



सिल्क मिल कॉलनी, पैठण रोड, औरंगाबाद.
मो. 9404018282, 8530483751 | इ-मेल : modanidk@gmail.com

प्रति,
मा. डॉ. सुरेश गोसावी,
कुलगुरु,
सावित्रीबाई फुले विद्यापीठ,
पुणे.

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 1 JAN 2025
आवक क्रमांक 221
जावक दिनांक 13 JAN 2025

दि. 01/01/2025
नुतन वर्षाभिनंदन

मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
13 JAN 2025
आवक क्रमांक:पीव्हीसी/ 143
जावक दिनांक: 14-1-25
विभाग: D/SD

**विषय : प्रजासत्ताक दिन - भारतीय सुजाण-सजग नागरिकत्व जागर अभियान.**
**भारतीय नागरिकत्वाची दीक्षा-प्रतिज्ञा.**

महोदय,

समाजाचा, राष्ट्राचा सर्वांगीण, गतिमान विकास, नागरिकांची सुजाणता, सजगता, जागरूकता, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय चारित्र्य, शासकीय योजनेतील सक्रीय सहभाग आदीवर अवलंबुन असतो. जागतिक स्तरावर सर्व क्षेत्रात स्पर्धा सुरू आहे. त्यात टिकून राहण्यासाठी नागरिकांची सुजाणता, सजगता, सक्रियता महत्त्वपूर्ण भूमिका निभावते.

नागरिकांच्या सहभागातून राष्ट्राचा भौतिक, आर्थिक विकास गतिमान होईल. त्यासोबत मानवाचा, नागरिकाचा शारिरीक, मानसिक, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक विकास होणे आवश्यक आहे.

भारतीय राज्यघटनेप्रमाणे देशातील युवक आपल्या वयाची 18 वर्षे पूर्ण केल्यानंतर नागरिक होतो. त्याची नागरिकत्व होण्याची प्रक्रिया ही गांभीर्याची, हक्काबरोबर कर्तव्याची जाण देणारी, भारतीय संविधानातील मूल्यांना बांधिल असण्याची, अंगीकारण्याची, संस्कार, धडा, जाणीव करून देणारी आहे. नागरिकत्व ही राष्ट्र जिवनात महत्त्वाची बाब असताना त्यासाठी सामुदायिकरित्या संस्था स्तरावर कुठलाही विधी, कार्यक्रम, उपक्रम नाही. ही मोठी पोकळी व अतार्किक (illogical) बाब आहे. ही बाब गांभीर्याने घेऊन **सुजाण-सजग नागरिकत्व जागर अभियान महात्मा गांधी सर्वोदय भवन, छत्रपती संभाजीनगर** च्या वतीने प्रजासत्ताक दिन राबविण्यात येतो.

आपणास विनंती की, आपल्या विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील वयाची 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या युवकांना रविवार दि. 26 जानेवारी 2025 प्रजासत्ताक दिनी महाविद्यालयातील राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम प्रसंगी त्यांना प्रमुख अतिथीच्या वतीने **सुजाण-सजग नागरिकत्वाची दीक्षा / प्रतिज्ञा** देण्यात यावी.

या पत्रासोबत प्रपत्रामध्ये नागरिकत्वाची प्रतिज्ञा दिलेली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी अशा प्रपत्राच्या दोन प्रती परिपूर्ण भरून स्वाक्षरी करावी. एक प्रपत्र महाविद्यालयाच्या संग्रही व एक विद्यार्थ्याच्या संग्रही राहील. प्रतिज्ञा दिल्यानंतर भारतीय राज्यघटनेची प्रास्ताविका भेट देण्यात यावी.

आपल्या कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयांना तशा सूचना निर्गमित कराव्यात, ही विनंती.

धन्यवाद.

**आपला राष्ट्र-समाजसेवेत,**

**ज्ञानप्रकाश मोदाणी**
**महात्मा गांधी सर्वोदय भवन, छत्रपती संभाजीनगर**

**सत्य • अहिंसा • प्रेम • सेवा • मानव्य • सर्वोदय अंत्योदय • जय जगत**

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा

व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;

दर्जाची व संधीची **समानता** ;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी **बंधुता**

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

**महात्मा गांधी सर्वोदय भवन**

सिल्क मिल कॉलनी, पैठण रोड, औरंगाबाद - 431 005 मो. 9404018282, 8530483751




महाविद्यालयाचे नांव : ______________________

## भारतीय सजग नागरिकत्व जागर अभियान

विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव: ______________________ वर्ग :

पत्ता : ______________________

मो. नं.: Email : ______________________

जन्मदिनांक: १८ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक :

## नागरिकत्वाची प्रतिज्ञा

मी, ______________________ आजच्या प्रजासत्ताक दिनी राष्ट्रध्वज तिरंग्यास अभिवादन करीत असताना गंभीरपणे प्रतिज्ञा करतो / करते की, माझे वय १८ वर्षे पूर्ण झालेले आहे व मी भारताचा / भारताची नागरिक होण्यास पात्र झालेलो / झालेली आहे.

भारतीय राज्यघटनेतील मूल्ये समाजवाद, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता, व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची एकात्मता, बंधुता यांमध्ये माझी बांधिलकी राहील व त्याच्या संवर्धनासाठी व्यक्तिगत व सामूहिक प्रयत्न करीन भारतीय लोकशाही अधिक अर्थपूर्ण व प्रगल्भ व्हावी यासाठी मी नागरिक म्हणुन हक्का बरोबर कर्तव्याची जाण ठेवीन.

भारतीय स्वातंत्र्यसंग्राम व हैद्राबाद मुक्तिसंग्रामात हुतात्मा झालेले स्वातंत्र्य सैनिक यांचे त्याग, बलिदान याची सदादित आठवण ठेवील. त्यांच्या प्रती कृतज्ञभाव जोपासेल. नवभारत निर्माणात सजग सुजाण नागरिक म्हणून तत्परतेने सहभागी होत राहील. सामाजिक सद्भाव, सलोखा संवर्धनासाठी क्रियाशील राहील. राष्ट्रीय संपत्ती, ऐतिहासिक ठेवा यांचे जतन, संवर्धन करील पर्यावरण रक्षण व संवर्धनासाठी मी कार्यरत राहील शाश्वत संतुलित विकासासाठी आवश्यक निसर्गस्नेही जीवनशैली अंगीकारील.

खंडप्राय, विविधतेने नटलेला प्राचीन संस्कृती, अनेक धर्मांचे उगमस्थान, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतास विश्वमंचावर अहिंसा, सहअस्तित्व, सहकार्य, समन्वय व विश्वशांतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी ऐतिहासिक जबाबदारीचे भान मला आहे.

स्थान : दिनांक : स्वाक्षरी-

( नांव : ______________________ )

टीप : नागरिकत्वासाठी पात्र विद्यार्थ्यांने प्रपत्र दोन प्रतीत भरावे. एक प्रपत्र महाविद्यालयाच्या व एक स्वतःच्या संग्रहासाठी ठेवावे. स्वतःकडील संग्रहीत प्रपत्र अधूनमधून अवलोकन करीत जावे. या प्रतिज्ञेची आठवण ठेवून मनोनिर्धार कायम राहील असे पहावे.